दि.कि.अर्ज क्र. ३९३/ २०१३
विद्यावती वि. माधव

| MHLA120011642013 | **निशाणी क्रमांक ८३ वरील आदेश** |
| --- | --- |

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१ माधव रामराव पाटील व प्रतिवादी क्र.५ रसिकाबाई रामराव पाटील यांच्या नावासमोर मयत वारस असे नमुद करण्यास परवानगीकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादी असे कथन करतात की, सदर प्रकरणातील अपील मा.जिल्हा न्यायाधीश साहेब, निलंगा येथे प्रलंबित असतांना यातील प्रतिवादी क्र.१ माधव रामराव पाटील हे दि.०७/०४/२०२२ रोजी मयत झाले आहेत. तसेच प्रतिवादी क्र.५ रसिकाबाई रामराव पाटील या दि.१८/१२/२०१७ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत प्रतिवादी क्र.१ व ५ यांचे सर्व वारस दाव्यात समाविष्ट आहेत. त्यांना पुन्हा अभिलेखावर घेण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या नावासमोर मयत वारस लिहण्याची परवानगी देण्यात यावी अशी ते विनंती करतात.

०३. प्रस्तुत अर्ज दि.२४/०२/२०२६ रोजी दाखल केल्यानंतर, अर्जाची प्रत प्रतिवादी यांनी दि.१३/०३/२०२६ रोजी घेऊन आजतागायत अर्जावर म्हणणे दाखल केलेले नाही. प्रकरण सन २०१३ चे असल्यामुळे त्यांच्या म्हहण्याविणा अर्ज पुढे चालू ठेवण्यात आलेला आहे.

०४. अर्ज व अभिलेख पाहिला. प्रस्तुतचा दावा वाटणी होऊन ताबा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीने त्यांच्या अर्जाच्या पृष्ठयर्थ नि.क्र.८४ कडे अर्जदाराचे शपथपत्र दाखल केलेले आहे. मा.जिल्हा न्यायालय, निलंगा यांनी सदरचे प्रकरण मृत्यूपत्रा संदर्भात पुरावा घेण्याकरीता रिमांड केलेले आहे. मा.जिल्हा

न्यायालयात अपील प्रलंबित असतांनाच प्रतिवादी क्र.१ व ५ हे मयत झालेले आहेत. त्यामुळे त्या अनुषंगानेची दुरुस्ती वादी ''मयत तर्फे वारस'' असे लिहण्याची परवानगी मागत आहेत. सदरची परवानगी ही अंतिम न्यायनिर्णयाकरीता आवश्यक आह असे दिसुन येते. सबब, अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे असे मत नोंदवून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज रक्कम रु.५००/– च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो. |
| ०२. | वादीने १४ दिवसांच्या आत सदर दुरूस्ती करणेची आहे व दुरूस्ती प्रत दाखल करणेचे आहे. |

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.04.06 16:51:21 +0530

निलंगा

दि. ०६/०४/२०२६

( श्रीमती. के. पी. गाडे )

२ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर

निलंगा, जि.लातूर